**प्रेसनोट दि. ०५/१२/२०१७** खडकी पोलीस स्टेशन, पुणे शहर

**सराईत घरफोडी करणा-या टोळीला अटक**

खडकी पोलीस स्टेशन कडील तपास पथकातील कर्मचारी पेट्रोलिंग करत असताना पोशि तुषार शिंदे, प्रदिप गाडे, हेमंत माने, रामदास मेरगळ यांना त्यांच्या बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, खडकी पोलीस स्टेशन गुरन १५२/१७ भादवि ४५४, ४५७, ३८० मध्ये १. अजिंक्य उर्फ सनी रविंद्र वाघमारे वय १९ वर्षे रा घर न १०५ महादेववाडी खडकी पुणे २. गणेश संजय वाघमारे वय १९ वर्षे रा घर न २४ महादेववाडी खडकी पुणे व अल्पवयीन बालक यांनी सदरचा गुन्हा केला असल्याचे माहिती मिळाल्यानंतर सदरची माहिती मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक खडकी पोलीस स्टेशन यांना कळविल्याने त्यांनी मिळालेली माहिती शहानिशा करुन कारवाई करणेबाबत मार्गदर्शन केले त्याप्रमाणे वरिल नमूद इसम यांना खडकी बाजार याठिकाणी ताब्यात घेवून त्यांचे ताब्यात सोन्या चांदीचे दागिने मिळून आले. मिळून आलेल्या दागिन्या संदर्भात तपास करता त्यांनी खडकी पो स्टे गुरनं १५२/१७ हा केल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांना सदर गुन्हयात अटक करुन पोलीस कोठडी रिमांड घेवून तपास करुन त्यांचेकडून खालील ११ दाखल गुन्हे त्यांनी केल्याचे निष्पन्न झाले आहे. त्याच्याकडून खालील गुन्हयातील चोरीस गेलेले दागिन्यापैकी साडेसतरा तोळयाचे किंमत रु ३,८३,५००/- सोन्याचे दागिने व रोख रक्कम ६,०००/- रु जप्त करण्यात आलेले आहेत.

१. खडकी पो स्टे गुरनं १५२/१७ भादवि ४५४, ४५७, ३८०
२. खडकी पो स्टे गुरनं २५१/१७ भादवि ४५४, ४५७, ३८०, ३४
३. खडकी पो स्टे गुरनं ३९/१७ भादवि ४५४, ४५७, ३८०, ३४
४. खडकी पो स्टे गुरनं ५४/१७ भादवि ४५४, ४५७, ३८०, ३४
५. खडकी पो स्टे गुरनं ६९/१७ भादवि ४५४, ३८०, ४२७, ३४
६. खडकी पो स्टे गुरनं १०९/१७ भादवि ४५४, ४५७, ३८०
७. खडकी पो स्टे गुरनं १३२/१७ भादवि ४५४, ४५७, ३८०
८. खडकी पो स्टे गुरनं १६५/१७ भादवि ४५४, ४५७, ३८०
९. खडकी पो स्टे गुरनं १८१/१७ भादवि ४५४, ३८०
१०. खडकी पो स्टे गुरनं १८६/१७ भादवि ४५७, ३८०
११. खडकी पो स्टे गुरनं २५८/१७ भादवि ४५४, ३८०

सदर कामगिरी परिमंडळ ४ पुणे चे पोलीस उप-आयुक्त दिपक साकोरे सो, सहा. पोलीस आयुक्त गणेश गावडे सो यांचे मार्गदर्शनाखाली खडकी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक श्री लक्ष्मण बोराटे व पोलीस निरीक्षक गुन्हे श्री अजित लकडे, तपास पथकाचे पोलीस उप-निरिक्षक निलेश महाडिक, मदन कांबळे, एम एस कालगुडे, पोलीस कर्मचारी तुषार शिंदे, प्रदिप गाडे, हेमंत माने, रामदास मेरगळ, सुरेश गेंगजे, बाबा शिर्के, ठोकळ अण्णा, विशाल मेमाणे, किरण घुटे, अशोक शेलार यांनी केलेली आहे.

तसेच खडकी पोलीस स्टेशन तर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की,

१. सोसायटी / अपार्टमेंट मध्ये सीसीटीव्ही कॅमेरे लावावेत.
२. बाहेरगावी जाताना मौल्यवान वस्तू किंवा पैसे घरामध्ये न ठेवता ते बॅकेच्या लॉकर्स मध्ये ठेवावेत.
३. घराला जाड कडी कोयंडा असलेले सेफ-टी दरवाजे असावेत.
४. बाहेरगावी जाताना नोकरास/वॉचमॅन याला आपल्या प्लॅन बाबत माहिती देवू नये.
५. वॉचमॅन नेमताना त्याची पूर्ण पडताळणी करुन नेमावा.